# तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय
# ता.सावंतवाडी

ई-मेल - tmosawantwadisindhu01@gmail.com

जा.क्र.ताआअका/प्रशा./UHWC दरपत्रक/ २६० /२०२६.

तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, ता.सावंतवाडी,
दिनांक – ०६/०३/२०२६

01

## दरपत्रक मागणी नोटीस

सन 2026 - 2027 या आर्थिक वर्षासाठी तालुका आरोग्य कार्यालय, सावंतवाडी अंतर्गत सावंतवाडी शहरात आपला दवाखाना व नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र येथे 15 व्या वित्त आयोग अंतर्गत Attendant व Cleaning Staff उपलब्ध करून देणे करिता बाह्यसंस्था निश्चित करणेकरिता इच्छुक दरपत्रक धारकांकडून खालील तपशिलात नमूद केलेप्रमाणे बंद लखोटयात दरपत्रके मागविणेत येत आहेत. **नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र, सावंतवाडी कार्यालयीन वेळ सकाळी 9.00 ते सायंकाळी 5.00 व हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे, आपला दवाखाना, सालईवाडा, सावंतवाडी कार्यालयीन वेळ दुपारी 2.00 ते रात्री 10.00 अशी आहे.**

| अ.क्र. | तपशील | मक्तेदाराने सर्व करासहीत भरावयाचा दर |
|---|---|---|
| 1 | सावंतवाडी शहरात आपला दवाखाना व नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र करिता दोन शिपाई कम सुरक्षारक्षक (Attendant / Guard) व दोन सफाईगार (Cleaning Staff) मनुष्यबळ पुरवठा करणेकरिता संस्था निश्चित करणेबाबत | |

इच्छुक दरपत्रक धारकांनी सदरची दरपत्रक नोटीस प्रसिध्द झालेपासून 8 दिवसांपर्यंत म्हणजेच दिनांक 17/03/2026 रोजी दुपारी 03.00 वाजेपर्यंत विहित नमून्यात परिपूर्ण दरपत्रक बंद लखोटयातून या कार्यालयास समक्ष आणून अथवा डाक सेवाव्दारे सादर करावयाची आहेत. मुदतीत प्राप्त दरपत्रकांची छाननी करून अटी व शर्तीपूर्ण झालेली दरपत्रके खोलून तुलनात्मक तक्त्याच्या आधारे किफायतशीर दरपत्रक धारकला पुढील आदेश देणेत येईल.

### दरपत्रकाच्या अटी व शर्ती

01) दरपत्रक सादर करतेवळी दरपत्रकासोबत खालील दस्तऐवज छायांकीत प्रती सादर करणे आवश्यक आहे,

1) संस्था नोंदणी प्रमाणपत्र/ जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र
2) संस्थेचे पॅनकार्ड झेरॉक्स
3) ESIC प्रमाणपत्र
4) P-Tax नोंदणी प्रमाणपत्र
5) EPF नोंदणी प्रमाणपत्र
6) 3 Month EPF भरणा केलेबाबतचे दस्तऐवज

02) ज्या दरपत्रकधारकांचे दरपत्रक मंजूर होईल त्यांनी आदेश दिलेपासून दरपत्रकात नमूद दरानुसार शिपाई व सफाईगार यांची तात्काळ नियुक्ती त्यांचे नियुक्ती आदेश या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहिल.

03) ज्या दरपत्रकधारकांचे दरपत्रक मंजूर होईल त्यांनी दरमहाचे देयक पुढील महिन्याच्या 1 तारीखला दरपत्रकात नमूद दरानुसार तसेच संबधीत कर्मचारी हजेरी अहवालासोबत या कार्यालयाला सादर करणे आवश्यक आहे. संबधीत कर्मचारी यांचेकडून केलेल्या कामाचे मुल्यामापन करुन प्रत्यक्ष केलेल्या कामाकाजानुसार मक्तेदार संस्थेच्या देयकामधून शासकीय प्रचलीत दरनुसार टी.डी.एस वजावट करुन देयकाची रक्कम संबधीत मक्तेदाराच्या बॅंक रक्कम जमा करणेत येईल.

04) तसेच संबंधीत कर्मचारी याना दरमहा ESIC/ EPF/ P-Tax इत्यादी संबधी वजावट विहीत वेळेत करुन तसेच कर्मचारी यांना वेतन प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी ही संबधीत मक्तेदार (मंजूर दरपत्रकधारक) यांची राहिल. त्यास हे कार्यालय जबाबदार असणार नाही.

05) विहित मुदतीत आदेश दिलेपासून कर्मचारी पुरवठा न केल्यास शासन नियमानुसार देय रक्कमेवर दंड देयकामधून वसूल केला जाईल. तसेच मक्तेदार संस्थेचे कामकाज समाधानकारक नसलेस अथवा शासनस्तरावरुन सदर आदेश रदद करणेसंदर्भात आदेश प्राप्त झालेस कोणत्याही क्षणी आगाऊ पुर्वकल्पना न देता सदरचे आदेश रदद करण्याचे अधिकार खाली सही करणार यांना राहतील.

06) मुदतीत प्राप्त न होणारी एक अगर सर्व दरपत्रके नाकारण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

07) ज्या दरपत्रकधारकांचे दरपत्रक मंजूर होणार त्या मक्तेदाराला रक्कम रु.500/- च्या बॉण्ड पेपरवर सोबत जोडलेले करारपत्र देणे बंधनकारक राहिल. सदरचे करारपत्र दिल्यावर कामचा आदेश दिला जाईल.

तालुका आरोग्य अधिकारी (गट-अ)
ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग

**दरपत्रक मागणी नोटीस लावण्याचे ठिकाण**

01) तालुका आरोग्य अधिकारी, सावंतवाडी नोटीसबोर्ड
02) www.nrhm.maharashtra.gov.in
03) www.arogya.maharashtra.gov.in

**वरील संकेतस्थळावर दरपत्रक नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून 7 दिवसाच्या मुदतीत दरपत्रक स्वीकारली जातील याची नोंद घ्यावी.**

## मक्तेदार संस्था व तालुका आरोग्य अधिकारी, सावंतवाडी यांचे करारपत्रातील समाविष्ठ करावयाच्या अटी व शर्ती

**अटी व शर्ती :-**

१) नियुक्त सेवा सोसायटीने तालुका आरोग्य अधिकारी सावंतवाडी यांचे नावे करारपत्र रु. ५००/- गैरन्यायिक बंधपत्रावर तयार करुन घेणेचे आहे.

२) संबंधित संस्थेचे नोंदणीपत्रक, पॅनकार्ड व आवश्यक ते सर्व पात्रतेचे निकष पुर्ण करणे आवश्यक आहेत. तसेच पात्रतेसंबंधी सर्व विहित कागदपत्रे सुपुर्त करणे आवश्यक आहे.

३) नियुक्त सोसायटीने नियुक्त करावयाच्या मनुष्यबळाला किमान वेतन कायद्याआधारे, माध्यमातुन रोजंदारी देणे बंधनकारक आहे. तसेच Employee Provident Fund, Employee State Insurance Corporation, Professional Tax याबाबत कायद्यानुसार पुर्तता करणेची जबाबदारी संस्थेची आहे.

४) कामासाठी नियुक्त करणेत येणारे व्यक्तींकडे आधार कार्ड असणे आवश्यक आहे.

५) कामासाठी नियुक्त करणेत येणारी व्यक्ती स्थानिक असणे आवश्यक आहे.

६) कामासाठी नियुक्त करणेत येणारी व्यक्ती प्रकृतीने निरोगी व सुदृढ असणे आवश्यक आहे.

७) कामासाठी नियुक्त करणेत येणारे व्यक्तीकडून सदरचे करारपत्र कार्यआदेश दिलेनंतर उमेदवारास हजर होईल त्या दिवशी मुळ प्रतीत सादर करणे बंधनकारक आहे.

८) **कामाची वेळ हि** आपला दवाखाना, सालईवाडा, सावंतवाडी साठी (दुपारी २ ते रात्रौ १० वेळेत) व नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र, सावंतवाडी साठी (सकाळी ९ ते सायंकाळी ५ वेळेत) **वाजेपर्यन्त आहे.**

९) संस्था कामगाराला कामावर जाणे येणेचा खर्च तसेच अन्य भत्ते शासनाकडून देय नाहीत.

११ रोजंदारी व्यक्तीचे महिन्यातील प्रत्यक्षात काम केलेले दिवस व स्विकृत दर यांचा गुणाकार करुन त्या रकमेचे देयक अदा करणेत येईल. नागरी आरोग्य वर्धिनी केंद्रास मंजूर शासकीय सुटटी संबधीत कर्मचारांना असतील परंतु सुटटीच्या दिवशी कामावर बोलविलेस संबधीत कर्मचा-यांना कामावर उपस्थित रहावे लागेल त्याकरिता संस्थेस अथवा कामगारास अतिरिक्त मानधन देय नसेल.

१२) कामाचे देयक दर महिन्याचे १ तारीखला सदर दिवशी शासकीय सुटटी असलेस पुढील कामकाजाचा दिवशी तालुका आरोग्य अधिकारी, सावंतवाडी यांचे नावे सादर करणे बंधनकारक आहे.

१३) देयक अदा करताना शासकिय प्रचलित नियमांनुसार कर वजावट करणेत येतील.

१४) उमेदवारांचे देयक संबधीत अदा करुन त्यांबाबतची पोंच घेणेची तसेच नियमानुसार ईपीएफ व इतर वजावटी करुन भरणेची जबाबदारी ही संबंधित संस्थेची राहील.

१५) रोजंदारी व्यक्तीने काम सोडलेस त्याची पर्यायी व्यवस्था २४ तासांत करावी. विलंब एक आठवड्यानंतर प्रति आठवडा ०.५ टक्के एवढी कपात देयकातून करण्यात येईल.

१६) रोजंदारी व्यक्तीला शासकिय सेवेसाठी अगर इतर कोणत्याही शासकिय हक्कासाठी दावा करता येणार नाही.

१७) रोजंदारी व्यक्तीचे काम समाधानकारक, सौजन्यपुर्ण वर्तणूक, नेमून दिलेले काम वेळेत पूर्ण करावयाचे आहे. तसेच रोजंदारी व्यक्तीची रुग्णकडुन किंवा इतराकडुन कोणत्याही स्वरुपाची तक्रार आल्यास सदरच्या व्यक्तीची तात्काळ पर्यायी व्यवस्था जबाबदारी ही कंत्राटदाराची राहील.

१८) रोजंदारी व्यक्तीला कामावर येताना व जाताना कोणताही अपघात अगर तत्सम इजा किंवा दुखापत झाल्यास त्याची जबाबदारी ही कंत्राटदाराची राहील. यावर शासन कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई देणार नाही.

१९) कार्यआदेश दिलेपासून २४ तासांचे आत मनुष्यबळ पुरविण्याच्या संस्थेने नियुक्तीपत्र देणेचे आहे.

२०) कामाची मुदत संपलेनंतर कोणतीही स्वतंत्र सुचना न देता कार्यआदेश संपुष्टात येतील.

२१) सेवा पुरविणेचा कालावधी हा दिनांक ०१ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२७ पर्यन्त राहील. कामाच्या आवश्यकतेनुसार यापुढील कराराला वाढ देणे अथवा करार संपण्यापुर्वी कामाचा आदेश रदद करणेबाबतचा अधिकार हा तालुका आरोग्य अधिकारी, सावंतवाडी यांना राहिल.

२२) मनुष्यबळ पुरविणेची संख्या ४ राहील. याबाबत आवश्यक सर्व बदलाबाबतचे सर्व अधिकारी मा. तालुका आरोग्य अधिकारी, सावंतवाडी यांचेजवळ राहातील. कोणत्याही व्यक्ती अगर संस्थेला स्पष्टीकरण मागता येणार नाही अगर न्यायालयात जाता येणार नाही.

२३) संस्थेने पुरवठा कर्मचा-याला दवाखान्याला असेलेल्या सर्व शासकीय सुटटी व सार्वजनिक सुटटी भरपगारी असतील या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा रजा मंजूर नाही. संबधीत कर्मचा-यांना सुटटी हवी असल्याने सदर दिवशी इतर कर्मचा-याची (पर्यायी व्यवस्था) संस्थेला करावी लागेल. अन्यथा सदर दिवसाचे मानधन वजावट केले जाईल.

तालुका आरोग्य अधिकारी (गट-अ)
ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग